मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 08 सप्टेंबर 2025 | पान - 1

# दहीहंडीच्या जल्लोषाला पोलिसांचा 'ब्रेक'!

## ध्वनीमर्यादा ओलांडणाऱ्या मंडळे व डीजे चालकांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांचा दणका!

» पिंपरी | प्रतिनिधी

**दहीहंडी उत्सवाच्या जल्लोषात डॉल्बीचा दणदणाट करत ध्वनीप्रदूषण करणाऱ्या मंडळे आणि डीजे चालकांना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी चांगलाच दणका दिला आहे. निर्धारित ध्वनीमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल १६ डॉल्बी साऊंड सिस्टीमवर पोलिसांनी धडक कारवाई करत त्या जप्त केल्या. या कारवाईमुळे उत्सवाच्या नावाखाली नियम धाब्यावर बसविणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.**




सार्वजनिक शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने दहीहंडी उत्सवादरम्यान विशेष मोहीम राबविली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड आणि अपर पोलीस आयुक्त (प्रादेशिक विभाग) बसवराज तेली यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस ठाण्यांना ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते.

त्यानुसार ५ सप्टेंबर २०२६ रोजी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध पोलीस ठाण्यांनी संयुक्तपणे कारवाई केली. या मोहिमेत निगडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्वाधिक चार डॉल्बी सिस्टीमवर कारवाई करण्यात आली. त्यापाठोपाठ बावधन येथे तीन, तर पिंपरी, संत तुकारामनगर, दापोडी, हिंजवडी, वाकड, काळेवाडी, भोसरी, दिघी आणि चाकण दक्षिण येथे प्रत्येकी एका डॉल्बी सिस्टीमवर कारवाई करण्यात आली.

उत्सवादरम्यान निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आवाजात डॉल्बी सिस्टीम वाजविल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी कोणतीही हयगय न करता संबंधित ठिकाणी धडक देत डॉल्बी स्पीकर्स, ॲम्प्लिफायर, मिक्सर आणि अन्य ध्वनी उपकरणे जप्त केली. संबंधित आयोजक तसेच डीजे चालकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, उत्सव साजरा करताना सार्वजनिक शांतता आणि नागरिकांच्या आरोग्याचा विचार करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर करताना निर्धारित नियम व ध्वनीमर्यादेचे पालन करावे, अन्यथा संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

दहीहंडीच्या उत्साहाला पोलिसांचा विरोध नसला, तरी उत्सवाच्या नावाखाली ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून पिंपरी-चिंचवड पोलिसांनी दिला आहे.

### डॉल्बीवर पोलिसांचा दणका!

दहीहंडी उत्सवादरम्यान ध्वनीमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या मंडळे व डीजे चालकांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी धडक कारवाई केली. निगडी, बावधनसह विविध भागांत तब्बल १६ डॉल्बी सिस्टीम जप्त करण्यात आल्या असून स्पीकर, ॲम्प्लिफायर, मिक्सर यांसह ध्वनी उपकरणे ताब्यात घेण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# काळेवाडीतील अनधिकृत बांधकामावर महापालिकेची धडक कारवाई!

» पिंपरी | प्रतिनिधी

**शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील काळेवाडी येथील राजवाडेनगर परिसरातील अनधिकृत बांधकामांवर महापालिकेने धडक कारवाई करत तब्बल ७ हजार ४०० चौ. फूट बांधकाम जमीनदोस्त केले. कडक पोलीस बंदोबस्तात राबविण्यात आलेल्या या कारवाईमुळे अनधिकृत बांधकामधारकांमध्ये खळबळ उडाली आहे.**



महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त, सह आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उपआयुक्त तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष कारवाई करण्यात आली. अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना प्रशासनाकडून आवश्यक त्या सर्व विभागांमध्ये समन्वय ठेवण्यात आला होता. कारवाईच्या ठिकाणी शहर अभियंता, सहशहर अभियंता (बांधकाम परवानगी व विद्युत), उपआयुक्त, सहाय्यक आयुक्त तसेच 'ब', 'क', 'ड' आणि 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतील संबंधित अधिकारी आणि कार्यकारी अभियंते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली ही कारवाई नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आली.

या विशेष मोहिमेसाठी महापालिकेच्या अभियांत्रिकी विभागातील १० कार्यकारी अभियंते, २८ उपअभियंते, कनिष्ठ अभियंते आणि १६ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक अर्थात बीट निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली होती. विविध पथकांच्या माध्यमातून परिसरातील अनधिकृत बांधकामांची पाहणी करून आवश्यक ती कारवाई करण्यात आली. कारवाईच्या प्रक्रियेत महावितरणचे अधिकारी आणि कर्मचारीदेखील सहभागी झाले होते. त्यामुळे महापालिका, अभियांत्रिकी विभाग आणि महावितरण यांच्या समन्वयातून ही मोहीम राबविण्यात आली.

अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, तसेच परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात आली होती. त्यासाठी कारवाईच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. एमएसएफ जवानांसह पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा घटनास्थळी तैनात ठेवण्यात आला होता. संभाव्य परिस्थितीचा विचार करून पोलिसांकडून संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवण्यात आले होते.

अनधिकृत बांधकाम हटविण्याच्या प्रत्यक्ष कारवाईसाठी पोकलेन यंत्रांसह ५ जेसीबी आणि २५ मजुरांची मदत घेण्यात आली. मोठ्या प्रमाणातील बांधकाम हटविण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ आधीच तैनात करण्यात आले होते. त्यामुळे कारवाई वेगाने आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यात आली. याशिवाय कारवाईदरम्यान कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्यावर तातडीने नियंत्रण मिळविता यावे, यासाठी अग्निशमन वाहने आणि रुग्णवाहिकाही घटनास्थळी सज्ज ठेवण्यात आल्या होत्या.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधातील महापालिका प्रशासनाची मोहीम यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. शहरातील अनधिकृत बांधकामांवर सातत्याने लक्ष ठेवून नियमबाह्य बांधकामे आढळून आल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.

# स्वाईन फ्लूचा विळखा; सणासुदीच्या गर्दीत धोका वाढला!

## एच१एन१ रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ; ताप-खोकल्याकडे दुर्लक्ष न करण्याचे आवाहन!



» पिंपरी | प्रतिनिधी

**शहरात सध्या 'एच१एन१' म्हणजेच स्वाईन फ्लूच्या रुग्णांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याचे समोर येत आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात गर्दी वाढणार असल्याने नागरिकांनी घाबरून न जाता वेळीच लक्षणे ओळखून योग्य खबरदारी घेणे गरजेचे बनले आहे. या आजाराची सुरुवात प्रामुख्याने ताप, घसा खवखवणे, खोकला, नाक वाहणे, अंगदुखी, डोकेदुखी आणि प्रचंड थकवा यांसारख्या नेहमीच्या फ्लूसदृश लक्षणांनी होते. विशेषतः लहान मुलांमध्ये उलट्या किंवा जुलाबाचा त्रासही दिसून येत असून, सध्या पुण्यातील काही रुग्णांमध्ये श्वसनाचा त्रास सुरू होण्यापूर्वी पोटाशी संबंधित तक्रारी उद्भवत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.**

मात्र, प्रत्येक ताप, सर्दी किंवा खोकला म्हणजे स्वाईन फ्लूच आहे असे नाही, हे नागरिकांनी लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे केवळ लक्षणे दिसत आहेत म्हणून घाबरून जाण्याची किंवा स्वतःच्या मर्जीने औषधे घेण्याची घाई करू नये. विशेषतः डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अँटिबायोटिक्स किंवा इतर औषधांचा वापर करणे कटाक्षाने टाळले पाहिजे. आजाराची योग्य तपासणी करून त्यानुसारच उपचार घेणे महत्त्वाचे आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला तसेच मधुमेह, दमा, सीओपीडी, हृदयविकार यांसारख्या जुनाट आजारांनी ग्रस्त असलेल्या 'हाय-रिस्क' गटातील नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. अशा व्यक्तींमध्ये संसर्गाची तीव्रता वाढण्याची शक्यता असल्याने सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

दरम्यान, श्वास घेण्यास अडचण निर्माण होणे, छातीत दुखणे, रक्तातील ऑक्सिजनची पातळी खालावणे, सतत वाढत राहणारा किंवा कमी न होणारा ताप, तीव्र अशक्तपणा, गोंधळलेली अवस्था तसेच ओठ निळे पडणे यांसारखी लक्षणे आढळल्यास ती धोक्याची चिन्हे मानली जातात. अशा परिस्थितीत केवळ घरगुती उपचारांवर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे अशी गंभीर लक्षणे जाणवू लागल्यास वेळ न दवडता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेऊन आवश्यकतेनुसार रुग्णालयात दाखल होणे अत्यावश्यक आहे.

सध्या सणासुदीची धामधूम सुरू होत असून, आगामी काळात विविध धार्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांमुळे मोठ्या प्रमाणावर नागरिक घराबाहेर पडणार आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा, सार्वजनिक ठिकाणे, मंडळांचे परिसर तसेच विविध कार्यक्रमांमध्ये मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. अशा गर्दीच्या ठिकाणी श्वसनमार्गाचे संसर्ग वेगाने पसरण्याचा धोका वाढतो. त्यामुळे आजारी असलेल्या व्यक्तींनी शक्यतो गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे आणि शरीराला पुरेशी विश्रांती देत घरीच राहावे.

सार्वजनिक तसेच गर्दीच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार मास्कचा वापर करणे, खोकताना किंवा शिंकताना रुमाल अथवा टिश्यूचा वापर करणे, त्यानंतर हात स्वच्छ धुणे, वारंवार साबणाने हात धुणे किंवा सॅनिटायझरचा वापर करणे यांसारख्या साध्या उपाययोजना केल्यास संसर्गाचा धोका कमी करण्यास मदत होऊ शकते. यासोबतच शरीराला पुरेसे पाणी आणि द्रवपदार्थ मिळतील याची काळजी घ्यावी. पौष्टिक आणि संतुलित आहार घेणे, पुरेशी झोप घेणे आणि शरीराची प्रतिकारशक्ती टिकवून ठेवणेही महत्त्वाचे आहे.

'सण आहे म्हणून आजार अंगावर काढायचा' असा निष्काळजीपणा नागरिकांनी करू नये. सणांचा आनंद घेत असतानाच स्वतःच्या आरोग्याची आणि आपल्या आजूबाजूच्या नागरिकांच्या आरोग्याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. लक्षणे जाणवल्यास ती लपविण्याऐवजी वेळेत वैद्यकीय सल्ला आणि योग्य उपचार घेऊन नागरिकांनी स्वतःसह कुटुंबीयांचे आणि इतरांचेही संरक्षण करावे.

> "नागरिकांनी स्वाईन फ्लूच्या वाढत्या रुग्णांमुळे घाबरून जाण्याचे अजिबात कारण नाही, परंतु गाफील अथवा निष्काळजी राहणेही तितकेच घातक ठरू शकते. सणासुदीच्या गर्दीत संसर्ग वेगाने पसरू नये म्हणून स्वच्छता आणि मास्कचा वापर यांसारख्या साध्या प्रतिबंधात्मक सवयी पाळणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा ताप अंगावर न काढता किंवा स्वतःहून गोळ्या न घेता, प्राथमिक टप्प्यावरच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास बहुतांश रुग्ण योग्य उपचारांनी पूर्णपणे बरे होतात."
>
> -डॉ. भाग्यश्री लहाने मुंडे,
> एम.डी मेडिसिन

# भंडारा डोंगरावर सापडले दीड वर्षीय बाळ; आई-वडिलांचा शोध सुरू!

» पिंपरी | प्रतिनिधी

**देहू येथील भंडारा डोंगर परिसरात दीड वर्षांचे गोंडस चिमुकले बाळ सापडल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. बाळाला स्वतःचे नाव, घराचा पत्ता किंवा आपल्या आई-वडिलांबाबत कोणतीही माहिती सांगता येत नसल्याने त्याच्या पालकांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान प्रशासन आणि पोलीस यंत्रणेसमोर उभे राहिले आहे. सध्या संबंधित यंत्रणांकडून विविध माध्यमातून बाळाच्या आई-वडिलांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.**



भंडारा डोंगर परिसरात बाळ आढळून आल्यानंतर त्याच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्याला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात सुरक्षित ठेवण्यात आले आहे. बाळाची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून, त्याच्या आरोग्याची आणि दैनंदिन गरजांची योग्य ती काळजी घेतली जात आहे. आई-वडिलांपासून दूर असलेल्या या चिमुकल्याला सध्या पोलीस कर्मचारी आणि संबंधित यंत्रणाच मायेचा आधार देत आहेत.

यावेळी महिला पोलीस कर्मचारी राणी राऊत या बाळाची अगदी आईप्रमाणे काळजी घेत आहेत. बाळाला वेळेवर जेवण भरविणे, त्याला आवश्यक ते खाऊ-पिऊ घालणे, त्याची वैद्यकीय तपासणी करून घेणे, त्याच्या हालचालींकडे लक्ष ठेवणे तसेच त्याला आवश्यक असलेली सर्व प्राथमिक काळजी घेण्याची जबाबदारी त्या पार पाडत आहेत. आईच्या कुशीत असण्याच्या वयात हे बाळ आई-वडिलांपासून दूर असल्याने त्याची काळजी घेताना राणी राऊत यांच्याकडून विशेष मायेने त्याचा सांभाळ केला जात आहे.

मात्र, हा सांभाळ केवळ तात्पुरता असून या चिमुकल्याला त्याच्या आई-वडिलांपर्यंत सुखरूप पोहोचवणे हेच प्रशासन आणि पोलीस यंत्रणेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे बाळाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध माध्यमांचा वापर केला जात आहे. बाळाची ओळख पटविण्यासाठी तसेच त्याच्या कुटुंबीयांपर्यंत माहिती पोहोचविण्यासाठी संबंधित यंत्रणांकडून प्रयत्न सुरू आहेत.

दरम्यान, या घटनेकडे नागरिकांनी केवळ एक बातमी म्हणून न पाहता मानवतेच्या भावनेतून या चिमुकल्याच्या पालकांचा शोध घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. बाळाची माहिती, फोटो किंवा व्हिडीओ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचल्यास त्याच्या आई-वडिलांपर्यंत ही माहिती पोहोचण्यास मदत होऊ शकते. विशेषतः देहू, भंडारा डोंगर आणि परिसरातील नागरिकांनी आपल्या परिचयातील कुटुंबांमध्ये अशा बाळाचा शोध घेतला जात आहे का, याची माहिती मिळाल्यास ती तातडीने पोलिसांपर्यंत पोहोचवावी.

तुमच्या एका शेअरमुळे या चिमुकल्याला त्याचे आई-वडील पुन्हा मिळू शकतात. त्यामुळे नागरिकांनी या बाळाची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन करण्यात येत आहे. सोशल मीडिया, स्थानिक नागरिक आणि विविध माध्यमांच्या मदतीने ही माहिती मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाल्यास पालकांचा शोध घेण्यास निश्चितच मदत होऊ शकते.

या बाळाबाबत कोणाकडेही माहिती असल्यास, बाळाला ओळखणारी व्यक्ती किंवा त्याच्या कुटुंबाबाबत कोणतीही माहिती असल्यास त्यांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

# पुण्यात डीजेच्या दणदणाटाला पोलिसांचा दणका!

## ११०० मंडळांची तपासणी, प्रेशरमीड आणि प्लाझ्मा साऊंडसह ध्वनिक्षेपक यंत्रणा जप्त!

» पुणे | प्रतिनिधी

**दहीहंडी उत्सवाच्या जल्लोषात निर्धारित ध्वनीमर्यादा ओलांडून मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपक वाजविणाऱ्या मंडळांविरुद्ध पुणे पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल ११६ मंडळांविरुद्ध खटले दाखल करण्यात आले आहेत. तसेच बंदी असलेल्या ध्वनिक्षेपक यंत्रणेचा वापर करणाऱ्या मंडळांवर कारवाई करत चार प्रेशरमीड, चार प्लाझ्मा साऊंडसह सहा ध्वनीवर्धक यंत्रणा जप्त करण्यात आल्या आहेत.**



### ११०० मंडळांची तपासणी; ११६ वर कारवाई!

दहीहंडी उत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी पुणे पोलिसांनी शहर आणि उपनगरातील तब्बल ११०० मंडळांची तपासणी केली. निर्धारित ध्वनीमर्यादा ओलांडणाऱ्या ११६ मंडळांविरुद्ध खटले दाखल करण्यात आले असून, सर्वाधिक ५५ खटले परिमंडळ एकमधील मंडळांविरुद्ध आहेत. तसेच बंदी असलेल्या प्रेशरमीड आणि प्लाझ्मा साऊंडचा वापर करणाऱ्या मंडळांवर कारवाई करत चार प्रेशरमीड, चार प्लाझ्मा साऊंडसह सहा ध्वनीवर्धक यंत्रणा जप्त करण्यात आल्या आहेत.

दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपकांचा वापर करणाऱ्या मंडळांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा पुणे पोलिसांकडून यापूर्वीच देण्यात आला होता. त्यानुसार शहर आणि उपनगरातील विविध दहीहंडी उत्सवांच्या ठिकाणी पोलिसांनी विशेष तपासणी मोहीम राबविली. ध्वनीची पातळी निर्धारित मर्यादेत आहे की नाही, हे तपासण्यासाठी पोलिसांकडून डेसिबल मोजणाऱ्या यंत्रणेचा वापर करण्यात आला.

या विशेष मोहिमेदरम्यान पुणे शहर आणि उपनगरातील तब्बल ११०० मंडळांची तपासणी करण्यात आली. दहीहंडी तसेच आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळांनी ध्वनिक्षेपक यंत्रणेत चार बास आणि चार टॉपचा वापर करावा, अशा सूचना पोलीस प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर प्रेशरमीड आणि प्लाझ्मा साऊंडसारख्या उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

पोलिसांच्या या सूचनांनंतर शहरातील बहुतांश मंडळांनी नियमांचे पालन केल्याचे निदर्शनास आले. अनेक मंडळांनी ध्वनिक्षेपक यंत्रणेचा वापरही केला नाही. मात्र, काही मंडळांकडून निर्धारित ध्वनीमर्यादेचे उल्लंघन करण्यात आल्याचे तपासणीदरम्यान समोर आले. अशा मंडळांविरुद्ध पोलिसांनी थेट कायदेशीर कारवाई केली.

ध्वनीमर्यादा ओलांडणाऱ्या एकूण ११६ मंडळांविरुद्ध खटले दाखल करण्यात आले असून, यामध्ये सर्वाधिक कारवाई मध्य भागातील म्हणजेच परिमंडळ एकमधील ५५ मंडळांवर करण्यात आली आहे. त्यामुळे दहीहंडीच्या जल्लोषात नियम मोडून मोठ्या आवाजात डीजे वाजविणाऱ्या मंडळांना पोलिसांनी चांगलाच दणका दिला आहे.

दरम्यान, बंदी घालण्यात आलेल्या प्रेशरमीड आणि प्लाझ्मा साऊंड उपकरणांचा वापर काही मंडळांकडून करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर संबंधित ठिकाणी कारवाई करून चार प्रेशरमीड, चार प्लाझ्मा साऊंड तसेच सहा ध्वनीवर्धक यंत्रणा जप्त करण्यात आल्या. या कारवाईमुळे उत्सवाच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण करणाऱ्यांवर पोलिसांची नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दहीहंडी उत्सवात नियमांचे पालन करणाऱ्या मंडळांना पोलिसांकडून सहकार्य करण्यात आले असले, तरी ध्वनीमर्यादा ओलांडून नागरिकांना त्रास देणाऱ्या मंडळांविरुद्ध कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवरही ध्वनिक्षेपकांच्या वापराबाबत पोलिसांकडून कठोर भूमिका घेतली जाण्याची शक्यता आहे.

# नळस्टॉप-वारजे-माणिकबाग मेट्रोला अखेर वेग; उड्डाणपुलांचा मार्ग मोकळा!

» पुणे | प्रतिनिधी

**नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग मेट्रो मार्गाच्या उभारणीतील महत्त्वाचा अडसर अखेर दूर होण्याच्या मार्गावर आहे. महर्षी कर्वे पुतळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या दोन महत्त्वाच्या ठिकाणी दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव 'महामेट्रो'ने महापालिकेकडे सादर केला आहे. या उड्डाणपुलांच्या रचनेचा आणि आराखड्याचा प्रश्न मार्गी लागल्याने मेट्रो प्रकल्पाला आता गती मिळण्याची शक्यता आहे. हे उड्डाणपूल महापालिका की महामेट्रो उभारणार, याचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नसला, तरी तो लवकरच होण्याची अपेक्षा आहे.**



### दुमजली उड्डाणपुलांची वैशिष्ट्ये!

महर्षी कर्वे पुतळा उड्डाणपुलाची लांबी १.६ किलोमीटर असून, तो कर्वे रस्त्यावरील हनुमान मंदिरापासून डहाणूकर कॉलनीतील हॉटेल मिर्च मसालाजवळपर्यंत उभारण्यात येणार आहे. या उड्डाणपुलासाठी ३२७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील उड्डाणपुलाची लांबी ५०० मीटर असून, तो डी मार्ट चौकापासून कॅनॉल रस्त्याजवळपर्यंत प्रस्तावित आहे. या पुलासाठी ७७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग या मेट्रो मार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाने गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये मंजुरी दिली होती. ६.१२ किलोमीटर लांबीचा हा संपूर्ण उन्नत मेट्रो मार्ग असून, त्यावर एकूण सहा स्थानके प्रस्तावित आहेत. कर्वे पुतळा, डहाणूकर कॉलनी, कर्वेनगर, वारजे, दौलतनगर आणि माणिकबाग या स्थानकांचा त्यामध्ये समावेश आहे. या मार्गामुळे वारजे, कर्वेनगर, डहाणूकर कॉलनी, माणिकबाग आणि परिसरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा मोठा पर्याय उपलब्ध होणार आहे.

या मेट्रो मार्गासह स्थानकांच्या उभारणीसाठी महामेट्रोने निविदा प्रक्रिया सुरू केली होती. मात्र, कर्वे पुतळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या दोन्ही ठिकाणी सध्याची वाहतूक कोंडी आणि रस्त्यावरील वाढता वाहनभार लक्षात घेऊन महापालिकेने दुमजली उड्डाणपूल उभारण्याची सूचना केली होती. त्यामुळे मेट्रो मार्गाच्या अंतिम आराखड्यात या उड्डाणपुलांचा समावेश करण्याचे काम सुरू होते. आता या पुलांची रचना आणि आराखडा अंतिम झाल्याने प्रकल्पाच्या कामातील महत्त्वाचा अडसर दूर झाला आहे.

या दोन्ही उड्डाणपुलांसह संबंधित मेट्रो मार्गाच्या उभारणीसाठी सुमारे ४०४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हा खर्च २०२१च्या बांधकाम दरांनुसार निश्चित करण्यात आला असून, सध्याच्या दरांनुसार त्यात सुमारे १० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. दोन्ही ठिकाणी उड्डाणपूल आणि मेट्रो अशी दुहेरी वाहतूक व्यवस्था असणार आहे. पहिल्या मजल्यावर वाहनांसाठी उड्डाणपूल, तर दुसऱ्या मजल्यावर मेट्रो मार्ग अशी या दुमजली संरचनेची रचना करण्यात आली आहे.

महामेट्रोने या दोन्ही उड्डाणपुलांचा आराखडा महापालिकेकडे सादर केला असून, महापालिकेकडून त्यावर लवकरच अंतिम निर्णय अपेक्षित आहे. हा निर्णय झाल्यानंतर मेट्रो मार्गाच्या प्रत्यक्ष उभारणीचा मार्ग अधिक सुकर होणार आहे. विशेष म्हणजे, या मार्गाच्या उभारणीसाठी महामेट्रोने जूनमध्ये निविदा मागविल्या होत्या. या निविदांना आता ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

त्यामुळे दुमजली उड्डाणपुलांच्या उभारणीबाबत वेळेत मंजुरी मिळाल्यास याच वर्षअखेरीस नळ स्टॉप-वारजे-माणिकबाग मेट्रो मार्गाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली. मेट्रो मार्ग आणि उड्डाणपूल एकत्रितपणे उभारल्यामुळे भविष्यात या मार्गावरील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पामुळे एकीकडे वारजे-माणिकबाग मेट्रोचे जाळे विस्तारण्यास मदत होणार असून, दुसरीकडे कर्वे पुतळा आणि आंबेडकर चौक परिसरातील वाहतूक कोंडीवरही कायमस्वरूपी उपाय होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील निर्णयाकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# बेकायदा औषध-सौंदर्यप्रसाधनांच्या विक्रीला 'एफडीए'चा दणका!

## २,९०२ तपासण्या, ८८० परवानाधारक आस्थापनांवर कारवाई, २० गुन्हे दाखल; २१ जणांना अटक!

**पुणे | प्रतिनिधी**

**औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) औषध विभागाने राज्यभर कारवाईचा धडाका लावला आहे. जून ते ऑगस्ट २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीत औषध उत्पादन आणि विक्री आस्थापनांच्या तब्बल २ हजार ९०२ तपासण्या करण्यात आल्या. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८८० परवानाधारक आस्थापनांवर नियामक कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे, १०४ शोध व जप्तीच्या कारवायांमध्ये तब्बल ११ कोटी ४१ लाख रुपयांचा बेकायदा औषधे आणि सौंदर्यप्रसाधनांचा साठा जप्त करण्यात आला. या कारवायांमध्ये २० आस्थापनांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून २१ जणांना अटक करण्यात आली आहे.**



या कालावधीत औषध उत्पादन आस्थापनांच्या ६०७, तर औषध विक्री आस्थापनांच्या २ हजार २९५ तपासण्या करण्यात आल्या. उत्पादन क्षेत्रातील १४०, तर विक्री क्षेत्रातील ७४०, अशा एकूण ८८० आस्थापनांवर नियामक कारवाई करण्यात आली. यामध्ये ६७७ परवाने निलंबित, तर २०३ परवाने रद्द करण्यात आले आहेत.

त्यामुळे नियम धाब्यावर बसवून औषधांची निर्मिती किंवा विक्री करणाऱ्या आस्थापनांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. एफडीएच्या तपासणीत काही औषध उत्पादन आस्थापनांमध्ये गंभीर स्वरूपाच्या त्रुटी आढळून आल्या. सक्षम तांत्रिक कर्मचाऱ्यांचा अभाव, मंजुरी नसलेल्या कर्मचाऱ्यांकडून बॅच मॅन्युफॅक्चरिंग रेकॉर्डमध्ये नोंदी करणे, गुणवत्ता नियंत्रण विभागात सक्षम तांत्रिक व्यक्तीच्या अनुपस्थितीत चाचण्या घेणे, ॲन्युअल प्रॉडक्ट क्वालिटी रिव्ह्यू न करणे, स्टेरिलायझेशनच्या नोंदींमध्ये त्रुटी, व्हेंडर ऑडिटचा अभाव तसेच उत्पादन आणि अभिलेखांमध्ये तफावत अशा गंभीर बाबी निदर्शनास आल्या.

काही आस्थापनांमध्ये निकृष्ट दर्जाची औषधे तयार केली जात असल्याचे, तसेच परवान्यात मंजूर नसलेल्या औषधांचे उत्पादन केले जात असल्याचेही तपासणीत उघड झाले. औषधांच्या गुणवत्तेशी थेट संबंधित अशा त्रुटींमुळे संबंधित आस्थापनांवर कठोर नियामक कारवाई करण्यात आली.

रक्तपेढ्या आणि रक्त साठवणूक केंद्रांच्या तपासणीतही अनेक नियमभंग समोर आले. नोंदणीकृत रक्त संक्रमण अधिकारी नसणे, रक्त संक्रमण आणि वितरणाच्या नोंदी अद्ययावत नसणे, रक्तपिशव्यांच्या साठ्याचा ताळमेळ न जुळणे, तापमान नियंत्रणात त्रुटी तसेच कालबाह्य किंवा दूषित रक्तपिशव्यांची अयोग्य साठवणूक अशा गंभीर त्रुटी आढळल्या.

याशिवाय रक्तघटकांची ट्रेसेबिलिटी आणि जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापनातही नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले. रक्त साठवणुकीशी संबंधित नियमांचे पालन न करणाऱ्या केंद्रांवरही प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला. औषध विक्री केंद्रांच्या तपासणीतही नियमबाह्य व्यवहार समोर आले.

नोंदणीकृत फार्मासिस्टच्या प्रत्यक्ष देखरेखीशिवाय औषध विक्री करणे, विना बिल व्यवहार करणे, बिलावर बॅच क्रमांक आणि मुदत नोंदवून न देणे, शेड्यूल एच-१ औषधांची अपूर्ण नोंदवही ठेवणे तसेच डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय अनुसूचित औषधांची विक्री होत असल्याचे एफडीएच्या निदर्शनास आले.

याशिवाय मुदत संपलेली औषधे विक्रीच्या साठ्यात ठेवणे, औषधांच्या खरेदी-विक्रीच्या नोंदींचा ताळमेळ न जुळणे आणि अमली तसेच अमलीसदृश औषधांच्या प्रत्यक्ष साठ्यात तफावत आढळल्याचेही एफडीएने नमूद केले आहे.

इन्सुलिन, लसी तसेच तापमानास संवेदनशील औषधांची योग्य तापमानात साठवणूक न करणे, फ्रीज किंवा कोल्ड स्टोरेजची अयोग्य स्थिती आणि औषध साठवणुकीच्या ठिकाणी स्वच्छतेचा अभाव अशा बाबींवरही कारवाई करण्यात आली. औषधांच्या साठवणुकीतील हलगर्जीपणामुळे त्यांची गुणवत्ता आणि सुरक्षितता प्रभावित होण्याची शक्यता असल्याने संबंधित आस्थापनांवर नियमांनुसार कारवाई करण्यात आली.

### तक्रारींच्या चौकशीला वेग; कारवाईत मोठी वाढ!

महर्षी कर्वे पुतळा उड्डाणपुलाची लांबी १.६ किलोमीटर असून, तो कर्वे रस्त्यावरील हनुमान मंदिरापासून डहाणूकर कॉलनीतील हॉटेल मिर्च मसालाजवळपर्यंत उभारण्यात येणार आहे. या उड्डाणपुलासाठी ३२७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील उड्डाणपुलाची लांबी ५०० मीटर असून, तो डी मार्ट चौकापासून कॅनॉल रस्त्याजवळपर्यंत प्रस्तावित आहे. या पुलासाठी ७७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

# आयुकाच्या 'मीरकॅट' डेटाला जर्मनीची ताकद; जगभरातील संशोधकांना फायदा!

**पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यातील इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स (आयुका) यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मीरकॅट 'ॲप्सॉप्शन लाईन सर्व्हे' या महत्त्वाकांक्षी रेडिओ खगोलशास्त्रीय प्रकल्पाला आता जर्मनीची साथ मिळाली आहे. दक्षिण आफ्रिकेतील मीरकॅट रेडिओ दुर्बिणीद्वारे जमा झालेल्या तब्बल १.५ पेटाबाइट अप्रक्रियित डेटाला जर्मनीतून दीर्घकालीन डेटा-मिरर सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे जगभरातील संशोधकांना या प्रचंड वैज्ञानिक डेटाचा अधिक सुलभतेने आणि दीर्घकाळ वापर करता येणार आहे.**



या प्रकल्पासाठी नियोजित १ हजार ४०० तासांचे निरीक्षण २०२५ अखेरपर्यंत पूर्ण करण्यात आले आहे. दक्षिण आफ्रिकेतील मीरकॅट रेडिओ दुर्बिणीद्वारे करण्यात आलेल्या या दीर्घकालीन निरीक्षणातून तब्बल १.५ पेटाबाइट इतका प्रचंड अप्रक्रियित डेटा जमा झाला आहे. या डेटावर आयुकामध्ये अत्याधुनिक डेटा पाइपलाइनच्या माध्यमातून प्रक्रिया केली जात असून, त्याचे शास्त्रीय पद्धतीने वर्गीकरण आणि संग्रहण केले जात आहे. आधुनिक रेडिओ दुर्बिणींमधून दररोज मोठ्या प्रमाणावर वैज्ञानिक माहिती निर्माण होत असते. अशा प्रचंड डेटाचे सुरक्षित व्यवस्थापन, दीर्घकाळ जतन आणि जगभरातील संशोधकांना उपलब्ध करून देण्यासाठी जर्मनीतील डेटा-मिरर सुविधा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

आयुका आणि जर्मनीतील डीझेडएममधील माहिती-तंत्रज्ञान पथकांच्या सहकार्याने ही डेटा-मिरर सुविधा उभारण्यात आली आहे. या सुविधेमुळे मीरकॅट सर्व्हेमधून मिळालेला १.५ पेटाबाइटचा महत्त्वपूर्ण वैज्ञानिक डेटा केवळ भारतातील संशोधन संस्थांपुरता मर्यादित राहणार नाही, तर जगभरातील वैज्ञानिक समुदायाला दीर्घकाळ उपलब्ध राहणार आहे. मोठ्या प्रमाणातील डेटाच्या सुरक्षिततेसोबतच त्याचा सातत्याने वापर आणि विविध वैज्ञानिक संशोधनांसाठी पुनर्प्रक्रिया करण्याची संधी यामुळे उपलब्ध होणार आहे.

आयुकाचे प्रमुख संशोधक प्रा. नीरज गुप्ता यांच्या मते, या डेटाच्या माध्यमातून विश्वातील अनेक महत्त्वपूर्ण प्रक्रियांचा अधिक सखोल अभ्यास करता येणार आहे. विशेषतः आकाशगंगांची उत्क्रांती, ताऱ्यांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेला वायू, आंतरतारकीय माध्यम आणि विश्वातील मोठ्या प्रमाणावरील संरचना यांचा अभ्यास करण्यासाठी हा डेटासाठा उपयुक्त ठरणार आहे. विश्वाच्या सुरुवातीच्या काळात आकाशगंगांची निर्मिती आणि त्यानंतर झालेली त्यांची उत्क्रांती समजून घेण्यासाठीही या निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचा मोठा फायदा संशोधकांना होऊ शकतो. त्यामुळे विश्वाच्या रचनेविषयीच्या अनेक मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधण्यास या प्रकल्पाची मदत होणार आहे.

या प्रकल्पाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भारताने उभारलेली आणि भारतातच कार्यरत असलेली अत्याधुनिक पायाभूत सुविधा. संपूर्ण प्रकल्पाचे नेतृत्व आयुका करीत असून, आयुकाने स्वतः विकसित केलेल्या डेटा पाइपलाइनच्या माध्यमातून प्रकल्पाच्या संपूर्ण १.५ पेटाबाइट डेटासंग्रहावर प्रक्रिया केली जात आहे. यामुळे भारतातील वैज्ञानिक आणि संशोधन संस्थांना या प्रचंड डेटावर काम करण्याची संधी मिळत असून, त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय संशोधकांसाठीही हा डेटासाठा खुला राहणार आहे.

जगभरातील कोणताही वैज्ञानिक भारतातील विद्यापीठांमध्ये किंवा इतर संशोधन संस्थांमध्ये उपलब्ध सुविधांचा वापर करून या डेटावर पुन्हा प्रक्रिया करून वेगवेगळ्या वैज्ञानिक उद्देशांसाठी त्याचा अभ्यास करू शकतो. एकाच डेटासाठ्याचा विविध संशोधन प्रश्नांसाठी वापर होऊ शकत असल्याने भविष्यात या प्रकल्पातून अनेक नवे वैज्ञानिक निष्कर्ष समोर येण्याची शक्यता आहे.